मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नाला, गटार सफाई मे अखेर पूर्ण करा

## मान्सूनपूर्व तयारी आणि आपत्ती व्यवस्थापन उपायांबाबतच्या आढावा बैठकीत आयुक्तांचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थिती उद्भवणार नाही, यासाठी शहरातील नालेसफाई व पावसाळी गटर सफाईची सर्व कामे मे अखेरपर्यंत पूर्ण करावीत. तसेच संभाव्य पूरपरिस्थितीत कोणतीही घटना घडल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून सर्व विभागांनी समन्वयाने परिस्थिती हाताळावी, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी अधिकाऱ्यांना दिले.



महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व तयारी तसेच आपत्ती व्यवस्थापन उपाययोजनांसंबंधी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पावसाळ्यात उद्भवणाऱ्या विविध समस्या तसेच आपत्कालीन परिस्थितीबाबत सर्वंकष चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने विविध विभागांकडे सोपविलेल्या कामकाजाचा आढावा आणि नियोजनाबद्दल माहिती घेण्यात आली. त्यावेळी आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामकाजाबाबत आदेश दिले.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता रामदास तांबे, श्रीकांत सवणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, ज्ञानदेव जुंधारे, मनोज सेठिया, संजय कुलकर्णी, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय चंद्र दादेवार, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, उपआयुक्त अण्णा बोदडे, मनोज लोणकर, रविकिरण घोडके, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, डॉ. अंकुश जाधव, अमित पंडित, राजेश आगळे, उमेश ढाकणे, सीताराम बहुरे, कार्यकारी अभियंता देवन्ना गट्टूवार, बापूसाहेब गायकवाड, साहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने उपस्थित अधिकाऱ्यांना आदेश व सूचना दिल्या. पूर परिस्थितीत तातडीने घटनास्थळावर पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणावी. पूर परिस्थिती सहजतेने हाताळण्यासाठी सर्व विभागांनी अंतर्गत समन्वय ठेवावा. पावसाळ्यात पाण्याच्या पातळीत वाढ होते, त्यामुळे सर्व यंत्रणा सुसज्ज असणे गरजेचे आहे. आपत्ती काळात कोणत्याही गंभीर परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करून नागरिकांमध्येही त्याबाबत जनजागृती करावी. शहरातील नालेसफाईच्या कामाला गती द्यावी. पाणी कोठेही तुंबणार नाही याची काळजी घ्यावी. नदीकाठी असणाऱ्या लोकवस्तीत पाणी शिरण्याच्या घटनांवर लक्ष ठेवावे. दुर्घटना टाळण्यासाठी सातत्याने या भागाची पाहणी करणे आवश्यक असून पूरबाधित व्यक्तींसाठी अन्न, निवास आदी सुविधांसह सर्व आवश्यक असणाऱ्या साधनसामग्रीची पूर्वव्यवस्था करावी, असे आदेश आयुक्त सिंह यांनी दिले.

### पूर्वतयारी करा

**» ज्या भागात पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थिती उद्भवते, त्यासाठी नागरिकांचे स्थलांतर कुठे करावे याबाबत पूर्वतयारी करावी. आपत्ती काळात त्वरित संपर्क करण्यासाठी विविध आवश्यक विभागांचे आणि संपर्क यंत्रणांचे संपर्क क्रमांक अद्ययावत ठेवावेत, तसेच हे क्रमांक २४X७ सक्रिय असतील याची दक्षता घ्यावी. वेळप्रसंगी वायरलेस यंत्रणा सज्ज ठेवावी. धोकादायक इमारतींची पाहणी करावी तसेच अनधिकृत आणि धोकादायक होर्डिंग्ज पाहणी करून ते काढण्यात यावेत. धोकादायक वृक्षांची वेळेत छाटणी करावी आदी सूचनादेखील आयुक्त सिंह यांनी यावेळी दिल्या.**

# मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर खासगी प्रवासी बस जळाली

## टायर फुटला, प्रवाशांनी भरलेली बस अचानक पेटली : चालकाच्या प्रसंगावधनानाने सगळे प्रवासी सुखरूप

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आज मोठी दुर्घटना टळली आहे. खाजगी बसने अचानक पेट घेतला होता. टायर फुटल्याने बसने पेट घेतल्याची माहिती आहे. या बसमध्ये अनेक प्रवासी प्रवास करत होते. मुंबईहून पुण्याच्या दिशेने ही बस निघाली होती. आढे गावच्या हद्दीत सकाळच्या सुमारास ही घटना घडली. बसने अचानक पेट घेतल्याने अनेक प्रवाशांचा जीव धोक्यात आला होता. चालकाने प्रसंगावधान दाखवत सर्व प्रवाश्यांना सुखरूप खाली उतरवलं त्यामुळे कोणत्याही प्रवाशाला दुखापत झाली नाही आहे, सगळे प्रवासी सुखरुप आहे. आगीवर अग्निशमन दल आणि यंत्रणेने नियंत्रण मिळवले आहे.



सकाळी साडेसात वाजता आढेगावच्या हद्दीत साडे सातच्या दरम्यान खासगी बसचा टायर फुटला. त्यामुळे बस जागेवरच पेटली. त्यानंतर शॉर्ट सर्किट झाल्यानं संपूर्ण बसने पेट घेतला. या बसमध्ये 36 प्रवासी होते. टायर फुटल्याची माहिती मिळताच बस चालकाने प्रसंगावधान दाखवलं आणि सगळ्या प्रवाशांना बसमधून उतवरून दिलं. चालकाने प्रसंगावधान दाखवल्याने सगळे प्रवासी सुखरुप बचावले. आय आर बी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, वडगाव वाहतूक पोलीस यंत्रणा यांच्या संयुक्त प्रयत्नाने आग विझवली गेली.

### मोठी दुर्घटना टळली...

बसचा अचानक आग लागल्याने मोठी दुर्घटना झाली असती. अनेक प्रवासी दगावण्याची भीती होती. त्यात सर्व वयोगटातील प्रवाशांचा समावेश होता. मात्र चालकाने प्रसंगावधान दाखवलं आणि मोठा अपघात टळलाय.

# महापालिकेकडून 'नदी स्वच्छता मोहिमे'चे आयोजन

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्त 22 एप्रिल ते 28 एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत शुक्रवारी (दि. २६) सकाळी ७ ते ९ या वेळेत भिडे पूल नदीकाठ परिसरात नदी स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या २०२४ च्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत जागतिक वसुंधरा दिनानिमित्त २२ एप्रिल ते २८ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून यात स्वच्छता अभियान, सिंगल युज प्लास्टिकबंदी अंमलबजावणीबाबत जनजागृती व कारवाई, ई-कचरा संकलन मोहीम या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगानेच शुक्रवारी सकाळी 'नदी स्वच्छता मोहिमेचे' आयोजन करण्यात आले होते. या अभियानात विविध क्षेत्रातील २५० व्यक्तींनी सहभाग नोंदवला आणि ३७० किलो सुका कचरा संकलित करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

यावेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. (इस्टेट), उपायुक्त संदीप कदम (घनकचरा व्यवस्थापन), उपायुक्त माधव जगताप (पर्यावरण विभाग), सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. केतकी घाटगे (घनकचरा व्यवस्थापन), सहाय्यक आयुक्त रवी खंदारे (शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय), पर्यावरण अधिकारी मंगेश दिघे, ब्रँड ॲम्बॅसीडर रुपाली मगर, विक्रांत सिंग, आम्रपाली चव्हाण, इमामुद्दिन इनामदार यांच्यासोबतच इतर अधिकारी आणि कर्मचारीवर्ग उपस्थित होते. तसेच मोहल्ला कमिटीचे सदस्य, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी देखील आपला सहभाग नोंदविला.



तसेच शहरातील काही महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी देखील नदी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला. यात एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, कै. बंडोजी खंडोजी चव्हाण महाविद्यालय, कावेरी इंटरनॅशनल स्कूल, हिराभाई व्ही. देसाई कॉलेज, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक आणि स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था, आदर पूनावाला क्लिनसिटी इनिशिएटिव्ह या संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

या अभियानामध्ये पर्यावरणपूरक, जागतिक तापमानवाढ संबंधी व स्वच्छता विषयक गीत सादर करण्यात आले. तसेच अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी.यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सर्वांना पर्यावरणपूरक सवयी जोपासण्याविषयी आवाहन केले. तसेच सिंगल युज प्लास्टिक बंदीसंबंधी जनजागृती करण्यासाठी अक्षरस्पर्श मतिमंद विद्यालय/ कार्यशाळा यांच्यामार्फत अपंग, मतिमंद व निराधार विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कापडी पिशव्यांचे सहभागींना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागींनी माझी वसुंधरा व मतदार जागृती शपथ घेतली आणि कार्यक्रम संपन्न झाला.

# पुणे विद्यापीठातील रिफ्रॅक्टरीत नित्कृष्ट जेवण

## मनसेने आंदोलन करत नित्कृष्ट जेवण प्रशासनातील अधिकाऱ्यांना लावले खायला

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठात तीव्र आंदोलन केले, रिफ्रॅक्टरीतील नित्कृष्ट जेवण प्रशासनातील अधिकाऱ्यांना चारले. रेफ्रॅक्टारी चालक, भोजन समिती अध्यक्ष व कॅन्टीन मॅनेजर यांना याप्रसंगी जाब विचारून जो पर्यन्त जेवणाचा दर्जा सुधारत नाही तसेच विद्यार्थांना पौष्टिक, पोटभर आणि दर्जेदार जेवण माफक दरात मिळणार नाही तो पर्यंत विद्यार्थी जे जेवण दररोज जेवतात तेच जेवण दररोज विद्यापीठ प्रशासनाला खायला घालण्याची आक्रमक भूमिका महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने घेण्यात आली.

यावेळी मनविसे पदाधिकाऱ्यांनी जेवणाची ताटे थेट कुलगुरूंच्या ऑफिस आवारात नेली आणि जबाबदार अधिकाऱ्यांना बोलावून विद्यार्थी खातात ते नित्कृष्ट जेवण संबंधितांना खायला घातले.



विद्यापीठ प्रशासन जेवणानावर लाखो रुपये खर्च करतात, विविध कार्यक्रमांसाठी १०००- १५०० रुपयांचे जेवण बाहेरून मागवण्यात येते परंतु विद्यार्थ्यांना मात्र त्यांच्या आरोग्याला त्रासदायक बेचव जेवण दररोज देण्यात येते. सुमारे पाच हजार विद्यार्थी दररोज याच रिफ्रॅक्टरी शेजारी शंकर महाराज मठातील मोफत अन्नछत्रातील खिचडी खातात परंतु रेफ्रॅक्टरी मध्ये फक्त २००-३०० विद्यार्थी च जेवतात ,याचे कारण म्हणजे तेथील नित्कृष्ट , दर्जाहीन असे जेवण आहे. सुमारे ९८ % विद्यार्थी तिथे जेवत नाहीत आणि तेच विद्यार्थी रात्री उपाशी राहतात किंवा बाहेर खातात अशी विदारक परिस्थितीत विद्यापीठातील विद्यार्थी शिकत आहेत. याला जबाबदार असणाऱ्या सर्वांना मनविसे आपल्या पद्धतीने थाऱ्यावर आणणार आणि पुढील ७ दिवसात हक्काचे असे दर्जेदार, पौष्टिक पोटभर जेवण विद्यार्थांना मिळवून देणार आहे तो पर्यंत हे आंदोलनअमित ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू राहणार आहे.या प्रसंगी कॅन्टीन मध्ये मनविसे कार्यकर्त्यांनी व विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणबाजी करून विद्यापीठाचा निषेध केला आणि यापुढे जेवणाबाबत काहीही तक्रार असल्यास अथवा कॅन्टीन चालक, प्रशासनाकडून विद्यार्थ्यांवर दबाव येत असल्यास मनविसे कडे संपर्क साधण्यास कळविले.

अमित ठाकरे यांनी जो अभूतपूर्व मोर्चा विद्यापीठात काढला होता त्यावेळी विद्यापीठातील जेवणाच्या दर्जाबाबत कुलगुरूंकडे आवाज उठविला होता आणि विद्यार्थ्यांच्या हक्काचं जेवण दर्जेदार आणि पौष्टिक मिळण्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने आज आक्रमक आंदोलन करण्यात आले.

# खोपोलीत पोलिसांचा रूट मार्च

## लोकसभा निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावा : उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. २६) खोपोली, शिळफाटा शहरात पोलिसांनी रुटमार्च झाला. लोकसभा निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावा, कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासंबंधीचे अवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी या वेळी केले.

मावळ लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर शांतता-सुव्यस्था कायम रहावी, राष्ट्रीय एकात्मता वृद्धींगत व्हावा, या उद्देशाने खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, वरिष्ठ पोलीस निरिक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली रूट मार्च काढण्यात आले.

सकाळी १० वाजता खालची खोपोली अग्निशमन दलाच्या मैदानावरून पथसंचलनास प्रारंभ करण्यात आला. खोपोली बाजारपेठ, शास्त्रीनगर, पाटणकर चौक, समाज मंदीर रोड, शिळफाटा



बाजारपेठ, गणेश नगर, पटेल नगर नंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर त्याचा समारोप करण्यात आला.

या वेळी सहाय्यक पोलीस निरिक्षक सुजित गडदे, कर्मराज गावडे, उपपोलीस निरिक्षक सुधाकर लहाने, अलोक किस्मतराव, अभिजीत व्हरंबले, पूजा चव्हाण, गोपनीय विभागाचे प्रदीप खरात, सतीश बांगर, पोलीस हवालदार सागर शेवते, प्रसाद पाटील यांच्यासह सीमा सुरक्षा दल ४७ जवान आणि खोपोली ठाण्यातील ३७ पोलीस अमंलदार उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता असल्याने पोलिस यंत्रणादेखील सज्ज झाली आहे. त्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पंचवटी पोलिसांकडून पंचवटी परिसरात रूट मार्च काढण्यात आला.

लोकसभा निवडणुकीचे उमेदवार जाहीर करण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे निवडणुकीची आचारसंहिता कधीही लागू शकते. लोकसभा निवडणुकीत कायदा सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी व गुन्हेगारांवर वचक निर्माण व्हावा, त्या दृष्टीने पंचवटी पोलिस ठाण्याच्या हद्दीत रूट मार्च काढण्यात आला.

सध्या लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागू असून पहील्या टप्प्यातील निवडणुक १९ एप्रील आहे तसेच १७ एप्रील रोजी राम नवमी उत्सव आहे . सण व लोकसभा निवडणूक अनुषंगाने कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी व कोणताही अनुचित घटना घडू नये , शांतता - सुव्यस्था कायम रहावी राष्ट्रीय एकात्मता तथा सामाजिक सौदार्य वृद्धींगत व्हावा या उद्देशाने पोलीस विभागाच्या वतीने रूट मार्च काढण्यात आला .

स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी निवडणूक आयोगाकडून काही नियम तयार केले जातात. या नियमांना आचारसंहिता असे म्हणतात. लोकसभा निवडणुकीच्या काळात संपूर्ण देशात आणि विधानसभा निवडणुकीच्या काळात निवडणूक होत असलेल्या संबंधित राज्यामध्ये ही आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

### आचारसंहितेमध्ये काय नियम

**» निवडणूक आचार संहिता लागू झाल्यावर अनेक नियम लागू केले जातात. या नियमांचे पालन सर्व नेत्यांना करावे लागते. आचार संहितेचे उल्लंघन कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवाराला करता येत नाही. कारण नियमांचे उल्लंघन केल्यास शिक्षेचीही तरतूद आहे. तसेच उमेदवारांना निवडणूक लढविण्यापासूनही रोखले जाऊ शकते. यासोबतच या काळात जनतेचा पैसा कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाला किंवा नेत्याला लाभदायक कामासाठी वापरता येणार नाही. निवडणुकांची तारीख ज्यावेळी जाहीर केली जाते, त्यावेळी आचारसंहिता लागू केली जाते. तसेच मतदान संपेपर्यंत ही आचारसंहिता लागू असते. सध्या आचारसंहिता लागू झाली असून मतदान होईपर्यंत ती कायम असेल.**

# टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या संकटात वाढ

## मर रोगाचा प्रादुर्भाव : फूल गळतीमुळे इत्पन्नात घट होण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

काही महिन्यांपूर्वी टोमॅटोचे भाव दोनशे रुपये प्रतिकिलो पर्यंत गेले होते. तयामुळे मावळ तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी टोमॅटोचे पीक घेतले. मात्र सध्या टोमॅटोला चांगला भाव मिळत नाही. तर दुसरीकडे यंदा तापमान वाढीचा सर्वाधिक फटका टोमॅटोला बसताना दिसत आहे. छोटी रोपे करपून जात आहेत.

मरीचे प्रमाण वाढल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात डाली लावाव्या लागत आहेत. काही शेतकऱ्यांच्या अख्ख्या बागा तापमान वाढीमुळे गेल्या आहेत. तर काहींना दुबार लागण करण्याची वेळ आली. छोटी रोपे जगविण्यासाठी



शेतकरी पंपाच्या साहाय्याने रोपांना पाणी घालताना दिसत आहेत.

यंदा तापमान वाढीमुळे टोमॅटोचे प्रचंड नुकसान झाले असून, शेतकरी विविध मार्गांनी रोपे जगविण्यासाठी व त्यांची वाढ होण्यासाठी धडपडत आहेत. काही शेतकऱ्यांनी बागांना मांडव घातले; परंतु त्याचाही फारसा उपयोग होत नसल्याचे दिसून आले. सध्या शेतकरी रोपांवर पाण्याची फवारणी करताना दिसत आहेत.

आंदर मावळ, नाणे मावळ आणि पवन मावळ याठिकाणच्या शेतकऱ्यांनी टोमॅटो लागवड मोठ्या प्रमाणात केली आहे. उन्हाळ्यात मार्च-एप्रिलमध्ये मोठ्या प्रमाणावर टोमॅटोच्या लागणी केल्या जातात. ढगाळ वातावरणामुळे किडीचा, रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो, तसेच फुलकळी गळती होते. छोटी रोपे आकसा, करपा यांना बळी पडतात, तसेच वाढत्या तापमानामुळे फळ वाढीवर परिणाम होत असून, वेळेआधीच फळे पिकणे, फुलांची संख्या घटणे, टोमॅटो पळकणे, फुटवा कमी यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

### ढगाळ वातावरणामुळे चिंता वाढली

**»तापमान वाढीचे संकट असतानाच गेल्या तीन चार दिवसांपासून परिसरात ढगाळ वातावरण आहे. दुपारनंतर तयार होणारे ढगाळ वातावरण टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढवत आहे. ढगाळ वातावरण हानिकारक असल्यामुळे टोमॅटो उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त आहेत. आधीच तापमान वाढीचा फटका बसला असताना ढगाळ वातावरणाचे नवीन संकट टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे.**

# कर भरण्यास पुणेकरांचे प्राधान्य

## पालिकेच्या तिजोरीत मागील 26 दिवसांत 253 कोटी रु. मिळकतकर जमा

**पुणे | प्रतिनिधी**

मिळकतकर दि. ३१ मेपूर्वी भरणाऱ्यांना महापालिकेकडून सर्वसाधारण करात ५ ते १० टक्के सवलत दिली जाते. याचा लाभ घेण्यासाठी पुणेकर प्राधान्य देत असून, गेल्या २६ दिवसात महापालिकेच्या तिजोरीत तब्बल २५३ कोटी रुपयांचा मिळकतकर जमा झाला आहे.




मागील वर्षी याच कालावधीत निवासी मिळकतींच्या ४० टक्के सवलतीचा गोंधळ सुरू असल्याने अवघा २५ कोटींचा कर जमा झाला होता. दरम्यान, महापालिकेकडून मिळकतकराच्या बिलांचे वाटप पूर्ण झाले असून या दोन महिन्यांतच महापालिकेस जवळपास हजार ते १२०० कोटींचा कर जमा होण्याची प्रशासनास अपेक्षा आहे.

महापालिकेकडून आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात २५ हजारांपर्यंत मिळकतकर असणाऱ्या नागरिकांना १० टक्के, तर त्यापेक्षा जास्त रकमेचा मिळकतकर असल्यास ५ टक्के सवलत दिली जाते. या शिवाय, या कालावधीत कर भरणाऱ्या नागरिकांसाठी महापालिकेकडून १ कोटी रुपयांपर्यंतच्या बक्षिसांची योजनाही राबविण्यात येते. त्यामुळे पुणेकरांकडून या कालावधीत कर भरण्यास प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र आहे.

एकीकडे मिळकतकर थकबाकीदारांच्या घरापुढे जाऊन बँड वाजविण्याची वेळ महापालिकेपुढे येत असताना, दुसरीकडे शिस्तबद्ध पुणेकरांचा ऑनलाइन मिळकतकर भरण्याकडे कल वाढत आहे. गेल्या दोन महिन्यांत साडेपाच लाख नागरिकांनी तब्बल ६९९ कोटी ८१ लाख ६५ हजार ६९० रुपयांचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे. त्यापैकी तीन लाख दोन हजार ४५८ जणांनी ऑनलाइन कर भरला आहे. दरम्यान, गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा ३३ कोटी ८१ लाख रुपये जास्त मिळकतकर जमा झाला आहे.

मिळकतकर हे पुणे महापालिकेचे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन आहे, त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी कर भरावा, यासाठी १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत मिळकतकर भरणाऱ्यांना २५ हजार रुपयांपर्यंत १० टक्के, तर त्यापुढे ५ टक्के सवलत देण्यात येते. या काळात शहरातील सर्व मिळकतकर भरणा केंद्रे सुटीच्या दिवशीही कार्यरत असतात, अनेक बँकांमध्येही मिळतकर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

> “ या महिन्यात १ लाख ७७ हजार ४८५ नागरिकांनी २५३ कोटी ४५ लाख रुपयांचा कर महापालिकेकडे जमा केला आहे. आणखी एका महिन्यापेक्षा जास्त कालावधी शिल्लक असून, यामध्ये पुणेकरांकडून मोठ्या प्रमाणात करभरणाहोईल अशी अपेक्षा आहे. या शिवाय, पालिकेकडून साडेअकरा लाख मिळकतकर बिलांचे वाटपही पूर्ण करण्यात आले आहे.
>
> – माधव जगताप, उपायुक्त, कर संकलन विभाग

पुण्यातील सर्व मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर भरणे अनिवार्य आहे. पुणे महानगरपालिका ही पुण्यातील निवासी, व्यावसायिक आणि संस्थात्मक मालमत्तांसाठी मालमत्ता कर वसूल करण्यासाठी जबाबदार असलेली अधिकृत प्रशासकीय संस्था आहे. संकलित महसूल पुण्यातील नागरिकांना विविध नागरी सुविधा देण्यासाठी पीएमसीद्वारे वापरला जातो. या ब्लॉगमध्ये, आम्ही पुण्यात मालमत्ता कर कसा भरावा, त्यात कोणत्या पायऱ्या आहेत, त्याची गणना कशी केली जाते आणि द्वारे देऊ केलेल्या कोणत्याही सवलतींबद्दल चर्चा करू. पीएमसी मालमत्ता कराचा भरणा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतींद्वारे सुलभ करण्यात आला आहे. पुणे मालमत्ता कर भरण्यासाठी अनेक ऑनलाइन पेमेंट पर्याय उपलब्ध आहेत, तर पीएमसीने स्थापन केलेल्या नियुक्त केंद्रांवर ऑफलाइन पेमेंट करता येते. वेळेवर पेमेंट करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, विविध प्रकारच्या सवलती देते. देय तारखेच्या आत मालमत्ता कर भरल्यास 2% सूट मिळते, ज्यामुळे मालमत्ता मालकांसाठी तो एक फायदेशीर पर्याय बनतो.

# पिंपळे गुरव येथे आगीमध्ये सात वाहनांचे नुकसान

## मोकळ्या जागेतील वाळलेल्या गवताला आग लागल्याने घडली घटना

**पुणे | प्रतिनिधी**

पवना नगर येथे मुख्य रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या मोकळ्या जागेतील वाळलेल्या गवताला अचानक शुक्रवारी (दि. 26) दुपारी चारच्या सुमारास आग लागली. या वेळी रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या सात चार चाकी वाहने या आगीच्या भक्षस्थानी आली. सदर पार्क केलेल्या वाहनांच्या पुढच्या भागाला वाळलेल्या गवताच्या आगीमुळे आणखी आग लागल्याची घटना घडून आली.



साडे चार वाजता वल्लभनगर, रहाटणी येथील अग्निशमन विभागाचे वाहन एका पाठोपाठ घटनास्थळी दाखल झाले. या वेळी क्षणाचाही विलंब न करता वल्लभनगर अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. मात्र, तोपर्यंत येथे पार्क केलेल्या वाहनाच्या पुढील बाजूला आग लागून वाहनांचे मोठे नुकसान झाले होते.

### घटनेविषयी माहिती

» पवना नगर येथील गणराज वडापाव समोरील रस्त्याच्या दुतर्फा बाजूस अचानक वणव्यामुळे वाळलेल्या गवताला आग लागली. सदर आग पार्क केलेल्या चार चाकी वाहनांजवळ येऊन वाहनांच्या पुढील बाजूने पेट घेतला. यावेळी मोठ्या प्रमाणात आगीच्या ज्वाला, धूर हवेत पसरत होता. या वेळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधींना आग लागल्याचे लक्षात येताच त्यांनी वल्लभनगर, रहाटणी येथील अग्निशमन विभागाला 4 वाजून 20 मिनिटांनी संपर्क करून घटनेविषयी माहिती दिली.

पवना नगर येथील गणराज वडापाव समोरील रस्त्याच्या दुतर्फा बाजूस अचानक वणव्यामुळे वाळलेल्या गवताला आग लागली. वाळलेल्या गवताला आग लागल्याने तीन वाहनांचे पुढील टायर फुटून अक्षरशः जळून खाक झाले होते. या वेळी अग्निशमन दलाचे लिडिंग फायरमन किरण निकाळजे, फायरमन कैलास वाघिरे, भूषण येवले, वाहनचालक संतोष कदम, प्रमोद जाधव, जवान सिद्धेश दरवेश, प्रतीक खांडगे, ओंकार शिंदे, शुभम क्षीरसागर, समीर पोटे, ऋषिकेश जगताप, ओंकार रसाळ, संकेत घोगरे यांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अथक परिश्रम घेतले.